# एमएमआरसीचा आपत्ती नियंत्रण कक्ष

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने पावसाळी आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज केला आहे. संपूर्ण भुयारी अशा कुलाबा ते सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. या ३३.५ किमी मार्गावर २६ स्थानकांचे, तसेच भुयारीकरणाचे काम सुरू आहे. या ठिकाणी पावसाळ्यात वाहतुकीची कोणतीही समस्या निर्माण होऊ नये, पादचारी आणि वाहनांना अडथळा होऊ नये यासाठी एमएमआरसीने पावसाळी आपत्ती नियंत्रण कक्ष तयार केला आहे. या अंतर्गत एकूण ४२८ जलशोष पंप आणि १५ तात्काळ उपलब्ध सेवा वाहने या सुविधेचे आयोजन केले आहे. एकूण सात पॅकेजमध्ये सुविधा उपलब्ध राहील. संपर्क +९१९१३६८०५०६५ आणि +९१७५०६७०६४७७.